# महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसटीआर-२०१८/प्र.क्र.१९/नोंदणी

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम काम रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १५ सप्टेंबर,२०१८

## ( Tender Notice)

## दरपत्रकाबाबतच्या सूचना

जलसंपदा विभाग(खुद्द),मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी लागणा-या रिसायकलिंग टोनरचा पुरवठा दि.०१.१०.२०१८ ते दि.३०.०९.२०१९ या एका वर्षाच्या कालावधीसाठी करण्याकरिता मोहरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. याबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

२. दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन टोनर रिसायकलींग करून पुरविण्याबाबतची दरपत्रक दि.२४/९/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात अवर सचिव (गु.व्य.),जलसंपदा विभाग,३ रा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२ यांचे नावे पाठवावेत.

३. दि. ०१.१०.२०१८ ते दि. ३०.०९.२०१९ या कालावधीकरीता खालील संगणक प्रिंटर टोनर रिसायकलिंग करण्याकरिता करार करावा लागेल.

| अ.क्र. | टोनर क्रमांक |
|---|---|
| १ | एच.पी. - ७८-ए, ८८-ए, १२-ए, |
| २ | कॅनॅन - ९२५, ३३७, ३०३, ३२८ |
| ३ | रिको टोनर RICOH-३११ Series |

४. मोहोरबंद लिफाफ्यावर "रिसायकलिंग टोनरचा पुरवठा करण्याबाबत दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.या लिफाफ्यामध्ये भाग-१ "तांत्रिक" व भाग-२ "अतांत्रिक" असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे तशा उल्लेखासह ठेवावेत.अशाप्रकारे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६. प्राप्त दरपत्रक उघडण्याची तारीख,वेळ आपण नमूद केलेल्या E mail पत्यावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर E-mail पत्ता स्पष्टपणे नमूद करावा.याबाबतची जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

७. दरपत्रक सोबतच्या विहित फॉर्मसह, दरपत्रकाचे रु.१००/- (ना-परतावा) शुल्क भरावे लागेल.

८. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर मागणी केलेल्या रिसायकलींग टोनरचा पुरवठा जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई येथे तात्काळ व स्विकृत दरपत्रकानुसार करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

९. रिसायकलींग टोनरचा पुरवठा केल्यानंतर १५ दिवसानंतर मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत.

१०. कोणतेही १ अथवा सर्व दर पत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रीया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

११. संगणक प्रिंटरच्या रिसायकलींग टोनरबाबत पुढील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

अ) रिसायकलींग टोनरपुरवण्याबाबत किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

ब) टोनरच्या आतील भाग ड्रम,पीसीआर,वेब रोलर,वायपर ब्लेड,डॉक्टर ब्लेड हे प्रत्येक रिसायकलींग टोनर मध्ये वापरण्यात येतील.

क) रिसायकलींग टोनरमध्ये ब्रँडेड पावडर मशिनव्दारे भरण्यात येईल.

ड) रिसायकलींग टोनर मधून प्रिंट होणाऱ्या प्रतीची संख्या मुळ टोनर मधून प्रिंट होणाऱ्या प्रतीच्या ९०%पेक्षा अधिक असेल.

इ) प्रिंटींगचा दर्जा उत्तम असेल.

फ) रिसायकलींग टोनर वापरामुळे विभागास नवीन (Original) टोनर खरेदी करण्याची आवश्यकता नसेल.

ग) विभागाच्या मागणीनुसार रिसायकलींग टोनर तात्काळ पुरविण्यात यावे.

थ) रिसायकलींग टोनर मध्ये काही दोष आढळून आल्यास पुरवठादाराकडून टोनर नि: शुल्क व तात्काळ बदलून देण्यात येईल.

च) सदोष टोनरमुळे प्रिंटर ना-दुरुस्त झाल्यास प्रिंटर दुरुस्तीचा खर्च पुरवठादाराच्या देयकामधून कपात करण्यात येईल/प्रिंटर पुरवठादाराकडून दुरुस्त करुन घेण्यात येईल.

छ) करार कालावधीमध्ये रिसायकलींग ऐवजी रिफीलींग टोनर पुरवठा केल्याचे निष्पन्न झाल्यास पुरवठादार कंपनीस सुयोग्य दंड आकारण्याचे व शिक्षा करण्याचे अधिकार शासनास असतील.

ज) "क" ते "छ" बाबींची पुर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल. व त्यास काळया यादीत टाकले जाईल.

झ) दरपत्रक स्विकृत होणाऱ्या पुरवठादारास उपरोक्त मुद्दे क्र. अ ते ज या बाबींची लेखी हमी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर द्यावी लागेल.

१२. रिसायकलींग टोनर मधून आवश्यक किमान समाधानकारक प्रती उपलब्ध झाल्या नाहीत तर सदरहु टोनर नि:शुल्क बदली करुन देणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे भाग-१ तांत्रिक दरपत्रक फॉर्म अ मध्ये नमूद असेल तरच निविदाकाराच्या दरपत्रकाबाबत विचार करण्यात येईल.

(रा.म.शिंदे)
अवर सचिव,जलसंपदा विभाग

जलसंपदा विभाग

नोंदणीशाखा, २ रा मजला, रुम क्रमांक-२३१, विस्तार इमारत,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दुरध्वनी क्रमांक - ०२२-२२७९३२५३

रिसायकलिंग टोनरचा पुरवठा करण्याबाबत निविदा

भाग-१ : अतांत्रिक दरपत्रक (फार्म-ब)

१. पुरवठादाराचे पूर्ण नांव :-----------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक:-अ) कार्यालय :-----------------------------------------

ब) मोबाईल :-----------------------------------------

४. E-mail Address:-----------------------------------------

| अ.क्र. | टोनर क्रमांक |
|---|---|
| १ | एच.पी. - ७८-ए, ८८-ए, १२-ए, |
| २ | कॅनॅन - ९२५, ३३७, ३०३, ३२८ |
| ३ | रिको टोनर RICOH-३११ Series |

दिनांक :-

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

( सुचना : - दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. अन्यथा निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)

जलसंपदा विभाग

नोंदणीशाखा, २ रा मजला, रुम २३१ विस्तार इमारत,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दुरध्वनी क्रमांक - ०२२-२२७९३२५३

रिसायकलिंग टोनरचा पुरवठा करण्याबाबत निविदा

भाग-१ : तांत्रिक दरपत्रक (फार्म-अ)

१. पुरवठादाराचे /संस्थेचे नाव :- ------------------------------------------------

२. संपूर्ण पत्ता /कार्यालय :- ------------------------------------------------

३. दूरध्वनी (कार्यालय) :- ------------------------------------------------

मोबाईल क्रमांक :-

फॅक्स-:- ------------------------------------------------

ई-मेल:- ------------------------------------------------

४. निविदा प्रपत्र भरून देण्याचा अंतिम दिनांक : २४ सप्टेंबर, २०१८ रोजी दु.४.०० वाजेपर्यंत

५. आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) :- ------------------------------------------------

६. वस्तू व सेवा कर ( GST ) क्रमांक :- प्रमाणपत्र देणारे कार्यालय ------------------------

:-प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक ------------------------

:- वैधतेची मुदत ------------------------

७. व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:-

दुकाने व संस्था अधिनियम १९४८:- प्रमाणपत्र देणारे कार्यालय ------------------------

:- प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक ------------------------

:- वैधतेची मुदत ------------------------

८. आपल्या संस्थेने यापूर्वी रिसायकलिंग टोनर पुरविलेल्या विभागाची/ कार्यालयाची प्रमाणपत्रे (३ वर्षाचा अनुभव असल्याबाबत) सादर करावीत.

९. दरपत्रकाच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक :-

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

(सुचना :-दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे.चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)